जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

25 JAN 2022

सकाळ

# प्रश्न सोडविण्याची धमक ठेवा; आयुष्य समृद्ध होईल

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के; 'सकाळ- यिन'च्या मुख्यमंत्र्यांसह अन्य मंत्र्यांचा सत्कार

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २४ : 'प्रश्न सोडविण्याची धमक ठेवा; आयुष्य समृद्ध होईल,' असा सल्ला कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे दिला.

सकाळ माध्यम समूहाच्या यंग इन्सिपिरेटर्स नेटवर्कच्या (यिन) मुख्यमंत्र्यांसह विविध मंत्र्यांच्या सत्कार समारंभात ते बोलत होते. त्यांच्या हस्ते मुख्यमंत्री पार्थ देसाई यांचा सत्कार झाला. 'सकाळ'च्या शिवाजी उद्यमनगरमधील मुख्य कार्यालयात कार्यक्रम झाला.

डॉ. शिर्के म्हणाले, 'पद व जबाबदारी हातात हात घालून येतात. 'यिन'च्या माध्यमातून मिळालेल्या संधीचे सोने करण्याची जबाबदारी तुमच्यावर आहे. अभ्यासक्रमाच्या चौकोनी व्यवस्थेपलीकडे शिकविणारे 'यिन'चे व्यासपीठ आहे. पदवीनंतर पालक तुम्हाला पुढे काय करणार, असा प्रश्न करतात. तो अभ्यासक्रमात असत नाही. त्यामुळे आताच स्वतःचे, कुटुंब, समाज व देशाचे प्रश्न समजून घेऊन उपाय शोधा. शंभरमधील पाच प्रश्न सोडवता आले तरी तो शोधनिबंधापेक्षा मोठा थेसिस होईल.'

सकाळ माध्यम समूहाचे संपादक संचालक श्रीराम पवार म्हणाले, 'यिनच्या माध्यमातून युवकांची संघटित शक्ती समाजाच्या भल्यासाठी उपयोगात आणायची आहे. त्यातून समाजभान आकाराला यावे, असाही उद्देश आहे. पारंपरिक शिक्षण पद्धतीपलीकडील अनेक गोष्टी यातून शिकायला मिळतात. संवादातून पटवून देण्याची वृत्ती तरुणाईच्या अंगी येणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानातील बदलांना सामोरे जाताना प्रश्न कसे सोडवावेत, हे कळणे महत्त्वाचे आहेत. त्यासाठी तरुणाईला यांच्या माध्यमातून दिशा देण्याचा प्रयत्न केला जात आहे.'

मराठी भाषा कॅबिनेट मंत्री रोहन शारबिद्रे, महापौर ऋतुजा पाटील, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष अनुप कुलकर्णी, संघटनमंत्री आरती पाटील, दुग्ध व्यवसाय मंत्री प्रवीण कोपार्डे, माहिती व जनसंपर्क मंत्री प्रणव पाटील यांचा सत्कार झाला.

यावेळी 'सकाळ'चे निवासी संपादक निखिल पंडितराव, उपसरव्यवस्थापक रवींद्र रायकर, मुख्य बातमीदार निवास चौगले उपस्थित होते. 'यिन' विभागीय समन्वयक अवधूत गायकवाड, निकेत पाटील, उद्देश पाटील, दिग्विजय पाटील, पौर्णिमा सूर्यवंशी, ज्ञानेश्वर शिंदे, साक्षी पाटील यांनी संयोजन केले. राजलक्ष्मी कदम हिने सूत्रसंचालन केले.



कोल्हापूर : येथे सकाळ माध्यम समूहाच्या यंग इन्सिपिरेटर्स नेटवर्कच्या (यिन) मुख्यमंत्र्यांसह अन्य मंत्र्यांच्या सत्कारप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, सकाळ माध्यम समूहाचे संपादक संचालक श्रीराम पवार, निवासी संपादक निखिल पंडितराव, उपसरव्यवस्थापक रवींद्र रायकर व मुख्य बातमीदार निवास चौगले, विभागीय समन्वयक अवधूत गायकवाड.

जनसंपर्क कक्ष

25 JAN 2022 लोकमत

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पदवी प्रथम वर्ष परीक्षांना पुढील आठवड्यात प्रारंभ

## महाविद्यालयांची तयारी सुरू : पहिले सत्र संपले

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांतील संलग्नित महाविद्यालयांमधील पदवी प्रथम वर्षाच्या हिवाळी सत्रातील परीक्षांचा प्रारंभ पुढील आठवड्यात होणार आहे. बहुतांश महाविद्यालयांनी १ ते १५ फेब्रुवारीदरम्यान या परीक्षा ऑनलाईन स्वरूपात घेण्याचे नियोजन केले आहे. त्याची तयारी महाविद्यालयांकडून सुरू आहे.

पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या यंदाच्या शैक्षणिक वर्षाचे पहिले सत्र सोमवारी संपले. हिवाळी सत्रात होणाऱ्या एकूण ६६४ परीक्षांचे वेळापत्रक शिवाजी विद्यापीठाने गेल्या महिन्यात जाहीर केले आहे. कोरोना, ओमायक्रॉनच्या वाढत्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने हिवाळी सत्रातील सर्व परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्याचा निर्णय घेतला आहे.

पारंपरिक अभ्यासक्रमाच्या पदवी प्रथम वर्षाच्या (प्रथम, द्वितीय सत्र) अशा सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाविद्यालयाच्या पातळीवर त्याचबरोबर डिप्लोमा, पी.जी. डिप्लोमा, सर्टिफिकेट कोर्सच्या परीक्षा महाविद्यालय आणि विद्यापीठ अधिविभाग पातळीवर २५ जानेवारी ते १५ फेब्रुवारी या कालावधीत घेण्याची सूचना परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केली आहे. मात्र, कोरोनामुळे यंदाच्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात उशिरा झाली. त्यामुळे या वर्षाचे पहिले सत्र सोमवारी संपले आहे. अभ्यासक्रम संपल्यानंतरच परीक्षा घेण्याचे महाविद्यालयांनी ठरविले आहे. त्यानुसार १ ते १५ फेब्रुवारी दरम्यान प्रथम वर्षाच्या परीक्षा घेण्याचा निर्णय महाविद्यालयांनी घेतला आहे. अभ्यासक्रम पूर्ण करणे, विद्यार्थ्यांचे मोबाईल क्रमांक, ईमेल आयडी संकलित करणे, ऑनलाईन परीक्षेची तयारी आदी स्वरूपातील कामे महाविद्यालय, अधिविभाग पातळीवर सुरू आहेत.

दरम्यान, पदवी प्रथम वर्ष आणि पदविका, पदव्युत्तर पदविका, प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या परीक्षा ऑनलाईन आयोजनाबाबत संलग्नित महाविद्यालयांनी सूचना केल्या असल्याचे परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी सांगितले.



### आकडेवारी दृष्टिक्षेपात

- संलग्नित महाविद्यालय : २७६
- विद्यापीठातील अधिविभाग : ३४
- प्रथम वर्षाचे विद्यार्थी : सुमारे ६५ हजार

परीक्षा घेण्याआधी अभ्यासक्रम पूर्ण होणे आवश्यक आहे. या आठवड्यात बहुतांश अभ्यासक्रम पूर्ण होईल. त्यानंतर दि. १ फेब्रुवारीपासून प्रथम वर्षाच्या परीक्षा घेण्याचे नियोजन महाविद्यालयांनी केले आहे.

- **डॉ. व्ही. एम. पाटील**, सचिव, शिवाजी विद्यापीठ प्राचार्य असोसिएशन

लोकमत

# ‘अज्ञात’ अवकाशांचा शोध’ उलगडणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभाग, मराठी अधिविभाग आणि द इंटरनॅशनल सेंटर फॉर साउथ एशियन स्टडीज, रशियन स्टेट युनिव्हर्सिटी फॉर द ह्युमॅनिटीज, मॉस्को, रशिया यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार (दि. २९) ते सोमवार (दि. ३१) दरम्यान आंतरराष्ट्रीय बहुविद्याशाखीय ऑनलाइन परिसंवाद होणार आहे. ‘दक्षिण आशिया : ‘अज्ञात’ अवकाशांचा शोध’ या शृंखलेतील ‘दक्षिण आशिया : समकालीन गतिमान वास्तव’ असा परिसंवादाचा विषय आहे, अशी माहिती डॉ. मेघा पानसरे आणि डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली.

या परिसंवादाचे उद्घाटन शनिवारी सकाळी अकरा वाजता होईल.

पुढारी

# विद्यापीठात गुरुवारपासून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी व्याख्यानमाला

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ यशवंतराव चव्हाण अध्यासन केंद्र, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने २७ जानेवारी ते १ फेब्रुवारी या कालावधीत दुपारी ४ ते ५ या वेळेत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. २७ जानेवारी रोजी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते ऑनलाईन व्याख्यानमालेचे उद्घाटन होईल. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे, डॉ. किशोर बेडकीहाळ (सातारा), राजकीय विश्लेषक डॉ. अशोक चौसाळकर, माजी खा. डॉ. जनार्दन वाघमारे, मराठी विश्वकोश मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे हे व्याख्यानमालेत मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती अध्यासनाचे डॉ. प्रकाश पवार यांनी दिली.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात २९ पासून आंतरराष्ट्रीय ऑनलाईन परिसंवाद

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभाग व मराठी अधिविभाग आणि द इंटरनॅशनल सेंटर फॉर साऊथ एशियन स्टडीज, रशियन स्टेट युनिव्हर्सिटी फॉर द ह्युमॅनिटीज, मॉस्को, रशिया यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २९ ते ३१ जानेवारी दरम्यान आंतरराष्ट्रीय बहुविद्याशाखीय ऑनलाईन परिसंवादाचे आयोजन केले आहे, अशी माहिती डॉ. मेघा पानसरे, डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली.

'दक्षिण आशिया : अज्ञात अवकाशांचा शोध' या शृंखलेतील 'दक्षिण आशिया : समकालीन गतिमान वास्तव -२०२२' मध्यवर्ती विषयावर हा परिसंवाद होणार आहे. शनिवारी (दि. २९) सकाळी ११ वाजता परिसंवादाचे उद्घाटन होईल. याप्रसंगी प्रा. वेरा जबोत्किना (प्र-कुलगुरू, इंटरनॅशनल अफेअर्स, मॉस्को), मा. निकलाई कुदाशेव (रशियाचे भारतातील राजदूत), महनीय पवन कपूर (भारताचे रशियातील राजदूत) व डॉ. इलेना रेमीजवा (संचालक, रशियन हाउस इन मुंबई) उपस्थित राहणार आहेत. ज्येष्ठ इतिहासकार प्रा. रोमिला थापर उद्घाटनपर व्याख्यान देणार आहेत. विख्यात भाषातज्ज्ञ प्रा. गणेश देवी बीजभाषण करतील. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाचे माजी संचालक डॉ. डी. दयालन विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहतील. कुलगुरू प्रा. डी.टी. शिर्के उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी असतील. विविध परिसंवादामध्ये देश-विदेशातील विचारवंत, अभ्यासक दक्षिण आशियाशी संबंधित विविध विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत.

25 JAN 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मराठी भाषा पंधरवड्यानिमित्त विद्यापीठात विविध कार्यक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग, इतिहास अधिविभाग, राज्यशास्त्र ज्ञान मंडळ, महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागाचे महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ व महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने यंदा मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त २५ ते २८ जानेवारी दरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.

दि. २५ पासून सायंकाळी ७ वाजता विविध विषयांवरील व्याख्यानाचे आयोजन केले आहे. राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष व प्रमुख संपादक राजा दीक्षित यांच्या हस्ते या ऑनलाईन कार्यक्रमाचे उद्घाटन होईल. मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त २५ जानेवारीस सकाळी ११.३० वाजता 'साहित्य चर्चा' या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. 'मराठी निसर्ग साहित्य' या विषयावर ही साहित्य चर्चा होणार आहे. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखकांशी संवाद हा गुरुवार, दि. २७ जानेवारीस दुपारी १२ वाजता कार्यक्रम होणार आहे. साहित्यिक किरण गुरव, सोनाली नवांगुळ, संजय वाघ आणि प्रणव सखदेव लेखकांशी संवाद साधता येणार आहे. शुक्रवार, दि. २८ रोजी दुपारी १२ वाजता कवी संमेलनाचे आयोजन केले आहे. सर्व कार्यक्रमांमध्ये सहभागासाठी https://www.facebook.com/SUKmarathi या फेसबुक लिंकचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

25 JAN 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मराठी भाषा पंधरवड्यानिमित्त शिवाजी विद्यापीठात विविध कार्यक्रम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग, इतिहास अधिविभाग, राज्यशास्त्र ज्ञान मंडळ, राज्य शासनाच्या कामगार विभागाचे महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ आणि महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने यंदा मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त मंगळवार, दि. २५ ते २८ जानेवारी या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. यामध्ये व्याख्यानमाला, साहित्य चर्चा, साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखकांशी संवाद आणि कवी संमेलन यांचा समावेश आहे.

दि. २५ ते २८ जानेवारी या कालावधीत दररोज सायंकाळी ७ वाजता विविध विषयांवरील व्याख्यानांचे आयोजन केले आहे. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष व प्रमुख संपादक राजा दीक्षित यांच्या हस्ते या ऑनलाईन कार्यक्रमाचे उद्घाटन होणार आहे. २५ जानेवारीस सकाळी ११:३० वाजता 'मराठी निसर्ग साहित्य' या विषयावर ही साहित्य चर्चा होणार आहे. या चर्चेत सलीम मुल्ला, संदीप नाझरे आणि दत्ता मोरसे यांचा सहभाग असणार आहे.

गुरुवारी दुपारी १२ वाजता साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखकांशी संवादाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. यामध्ये साहित्यिक किरण गुरव, सोनाली नवांगुळ, संजय वाघ आणि प्रणव सखदेव या लेखकांशी श्रोत्यांना संवाद साधता येणार आहे.

शुक्रवार, दि. २८ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजता कवी संमेलनाचे आयोजन केले आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कवयित्री नीरजा भूषविणार असून, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष प्रा. राजा दीक्षित यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे.

सकाळ

# ऑनलाईन परिसंवाद २९ पासून

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभाग, मराठी अधिविभाग व दि इंटरनॅशनल सेंटर फॉर साऊथ एशियन स्टडीज, रशियन स्टेट युनिव्हर्सिटी फॉर द ह्युमॅनिटीज(मॉस्को,रशिया) यांच्या संयुक्त विद्यमाने २९ ते ३१ जानेवारीदरम्यान आंतरराष्ट्रीय बहुविद्याशाखीय ऑनलाईन परिसंवाद होत आहे, अशी माहिती डॉ. मेघा.पानसरे आणि डॉ. रणधीर शिंदे यांनी पत्रकाद्वारे दिली आहे. 'दक्षिण आशिया : 'अज्ञात' अवकाशांचा शोध' ("Open Pages in South Asian Studies - IV", Kolhapur, India) या शृंखलेतील 'दक्षिण आशिया: समकालीन गतिमान वास्तव – 2022' (The Contemporary Dynamics of South Asia –2022) मध्यवर्तीविषयावर परिसंवाद होईल.

जनसंपर्क कक्ष
25 JAN 2022 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कल्याण निधी योजना ठरली वारसांना आधारवड

## नैसर्गिक, अपघाती मृत्यूसह अपंगत्व आल्यास मिळते सहाय्य



**कल्याण निधीसाठी २०२०-२१ मध्ये आलेले प्रस्ताव**

(नैसर्गिक व अपघाती मृत्यू)

- विद्यार्थी - १३
- पालक - ३२
- प्रशासकीय सेवक - १२
- शिक्षक - २

**“ १ एप्रिल २०२१ ते आजपर्यंत १९७ प्रकरणांत १ कोटी ७० लाख रुपये दिले आहेत. योजनेसाठी महाविद्यालयातून प्रस्ताव यावे लागतात. त्याची प्रक्रिया साधी व सोपी आहे. आत्महत्या केल्यास योजनेचा लाभ वारसांना दिला जात नाही.**
**-डॉ. आर. व्ही. गुरव, संचालक,**
विद्यार्थी विकास विभाग

**संदीप खांडेकर : सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २४ : शिवाजी विद्यापीठाच्या कल्याण निधी योजनेतून वर्षभरात नैसर्गिक, आकस्मिक मृत्यू व अपंगत्वाच्या १९७ प्रकरणांत १ कोटी ७० लाख रुपये निधी दिला आहे. दोन वर्षांतला हा आकडा २ कोटी ६३ लाख इतका असून, २०१९-२० ला ५९ प्रकरणांत ६६ लाख रुपये दिले. विद्यार्थी, पालक, शिक्षक व प्रशासकीय कर्मचाऱ्याचा नैसर्गिक, आकस्मिक व अपघाती मृत्यूसह अपंगत्व आल्यावर हा निधी देण्यात येत असून, विद्यार्थी विकास विभागातर्फे ही योजना राबवली जात आहे.

ही योजना २०१४-१५ पासून सुरू झाली. त्यात २०१९-२० ला बदल केले. डॉ. सी. टी. कारंडे यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या सूचनांचा अंतर्भाव केला. प्रति विद्यार्थी ५०, शिक्षक २००, प्रशासकीय सेवकास १००, तर ज्यांचा ग्रेड पे सहा हजारांहून अधिक आहे, त्यांच्याकरिता २०० रुपये योजनेंतर्गत आकारले जातात. योजनेतील सहभागी घटकांचा नैसर्गिक अथवा आकस्मिक मृत्यू झाल्यास त्यांच्या वारसाला दीड लाख रुपये कल्याण निधी रक्कम दिली जाते.

विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी बाहेरगावी जाताना नैसर्गिक अथवा अपघाती मृत्यू झाल्यास ही रक्कम दोन लाख इतकी देण्यात येत आहे. अपंगत्वाची रक्कम कोणता अवयव निकामी झाला आहे त्यानुसार दिली जाते.

विद्यार्थ्यांच्या पालकांचा आकस्मिक अथवा नैसर्गिक मृत्यू झाला तर ७५ हजार रुपये, तर पालकाच्या अपंगत्वाकरिताही रक्कम दिली जाते. घटना घडल्यापासून कल्याण निधीसाठी प्रस्ताव सादर करण्याची मर्यादा १८० दिवस आहे.

तरूण भारत

# विद्यापीठात शनिवारपासून ऑनलाईन परिसंवाद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा, मराठी अधिविभाग आणि दि इंटरनॅशनल सेंटर फॉर साऊथ एशियन स्टडीज, रशियन स्टेट युनिव्हर्सिटी फॉर द ह्युमॅनिटीज, मॉस्को, रशिया यांच्या संयुक्त विद्यमाने २९ ते ३१ जानेवारी दरम्यान आंतरराष्ट्रीय बहुविद्याशाखीय ऑनलाईन परिसंवाद आयोजित केल्याची माहिती डॉ. मेघा पानसरे आणि डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली. परिसंवादाचे उद्‌घाटन शनिवारी, २९ रोजी सकाळी ११ वाजता होईल. प्रा. वेरा जबोत्किना (प्र–कुलगुरू, इंटरनॅशनल अफेअर्स, मॉस्को), निकलाइ कुदाशेव (रशियाचे भारतातील राजदूत), पवन कपूर (भारताचे रशियातील राजदूत) व डॉ. इलेना रेमीजवा संदेश देतील. या सत्रात ज्येष्ठ इतिहासकार प्रा. रोमिला थापर उद्‌घाटनपर व्याख्यान देणार आहेत, विख्यात भाषातज्ज्ञ प्रा. गणेश देवी बीजभाषण करतील. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाचे माजी संचालक डॉ. डी. दयालन प्रमुख पाहुणे म्हणून तर शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील. प्रा. उर्वशी बुटालिया, प्रा. उमा चक्रवर्ती, प्रा. सईदा हमीद (दिल्ली), प्रा. महेंद्र लावोटी, खुशी कबीर, अ‍ॅड. निमाल्का फेर्नान्दो डॉ. तैमुर रहमान मार्गदर्शन करणार आहेत.

तरूण भारत

# विद्यापीठात आजपासून मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग, इतिहास अधिविभाग, राज्यशास्त्र ज्ञान मंडळ, महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागाचे महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ आणि महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येणार आहे. आज (दि. २५) पासून या पंधरवड्याला सुरूवात होणार आहे. व्याख्यानमाला, साहित्य चर्चा, साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखकांशी संवाद आणि कवी संमेलन यांचा समावेश आहे.

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष व प्रमुख संपादक राजा दीक्षित यांच्या हस्ते या ऑनलाईन कार्यक्रमाचे उद्घाटन होईल. डॉ. नंदकुमार मोरे यांचे 'तंजावर राज्याचा भाषाविषयक दृष्टिकोन', डॉ. रणधीर शिंदे यांचे 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा भाषाविषयक विचार', डॉ. राजेंद्र मगर यांचे 'सयाजीराव महाराज यांचे भाषाविषयक कार्य" आणि डॉ. सूर्यकांत गायकवाड यांचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा भाषाविषयक विचार' या विषयावर व्याख्यान होणार आहेत. 'मराठी निसर्ग साहित्य' या विषयावर ही साहित्य चर्चा होईल, यात सलीम मुल्ला, संदीप नाझरे आणि दत्ता मोरसे यांचा सहभाग असणार आहे. संवाद क्षेत्रात साहित्यिक किरण गुरव, सोनाली नवांगुळ, संजय वाघ आणि प्रणव सखदेव या लेखकांशी श्रोत्यांना संवाद साधता येणार आहे. कवी संमेलनाच्या अध्यक्षस्थानी कवयित्री नीरजा असतील.